गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS
RNI NO. MAHMAR/2023/84162

वर्ष १ ले ● अंक २७१ वा ● बुधवार २१ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 271 | Date : 21/02/2024 blow :Wednesday Page 4 Price 4

# मराठा समाजाला १० टक्के आरक्षण

मुंबई : मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये दहा टक्के आरक्षण देण्याऱ्या विधेयकाला मंगळवारी राज्य विधिमंडळाने एकमताने मंजुरी दिली आहे. राज्यपालांची या विधेयकावर स्वाक्षरी झाल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होणार आहे. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिले असले तरी राजकीय आरक्षणाचा यामध्ये समावेश नाही. राज्य विधिमंडळाच्या एकदिवसीय विशेष अधिवेशनात मराठा आरक्षण विधेयक एकमताने मंजूर झाल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षणासाठी मराठा आरक्षण विधेयक महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले. यानंतर हे विधेयक विरोधकांसह सत्ताधारी आमदारांच्या एकमताने विधिमंडळ सभागृहात आवाजी मतदानाने मंजूर झाले. राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षण आणि शासकीय, निमशासकीय सेवांमध्ये १० टक्के आरक्षण देणारे विधेयक आणले असून ते




विधिमंडळात मांडण्यात आले. या विधेयकात एसईबीसी प्रवर्गातच स्वतंत्रपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस असून ओबीसीत समावेश केलेला नाही. विधानसभेनंतर मराठा आरक्षण विधेयक विधानपरिषदेतही एकमताने मंजूर झाले. मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठा आरक्षण विधेयक विधानपरिषदेच्या पटलावर ठेवले. यावर सर्व सदस्यांनी 'होय' म्हणून अनुमोदन दिले. त्यावर विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधेयक बहुमताने संमत झाल्याची घोषणा केली.

या विधेयकात एसईबीसी प्रवर्गातच स्वतंत्रपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस असून ओबीसीत समावेश केलेला नाही. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी सकाळी विशेष अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. राज्य मागासवर्ग आयोगाच्या ताज्या अहवालात मराठा समाज हा सामाजिक, आर्थिक व । पान २ वर

## सकल मराठा समाजाकडून आरक्षण निर्णयाचे स्वागत

नागपूर : राज्य विधिमंडळात मंगळवारी एकमताने मराठा आरक्षणाचे विधेयक मंजूर करण्यात आले. परंतु, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील हे आंदोलनावर ठाम आहेत. तर दुसरीकडे नागपुरात सकल मराठा समाजाने महाल गांधीगेट परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करीत, फटाक्यांची आतषबाजी, एक मराठा, लाख मराठा घोषणाबाजीसह जल्लोषात स्वागत करण्यात आले.

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी राज्य सरकारने आरक्षणात १० टक्के वाटा देऊन पूर्ण केली. मराठा आरक्षणावर दिलेल्या निर्णयाचे सकल मराठा समाजाने फटाके फोडून जल्लोष करत सरकारचे अभिनंदन केले. राज्य सरकारने विशेष अधिवेशनात विधेयकाला मंजुरी दिल्याने आम्ही समाधानी आहोत, आपली कोणतीही फसवणूक झाली नसल्याची भावना सकल मराठा समाजाच्यावतीने व्यक्त करण्यात आली आहे.

## ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यातबंदी कायम

पुणे : देशांतर्गत बाजारांत कांद्याची उपलब्धता कायम राहावी आणि भाव नियंत्रणात राहावेत यासाठी ८ डिसेंबर २०२३ रोजी अधिसूचना काढून ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू केलेली निर्यातबंदी कायम असेल, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाचे सचिव रोहित कुमार सिंह यांनी मंगळवारी दिली. निर्यात बंदी उठवण्यात आलेली नाही. सद्या:स्थितीत केंद्र सरकारच्या निर्णयात कोणताही बदल होणार नाही. देशात कांदा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करणे आणि त्याचे दर नियंत्रणात ठेवण्यास केंद्राचे प्राधान्य आहे, असे सिंह यांनी म्हटले आहे. ३१ मार्च २०२४ नंतरही कांद्यावरील निर्यात बंदी कायम राहण्याचा अंदाज 'पीटीआय'च्या वृत्तात वर्तवण्यात आला आहे. निर्यात बंदी उठवल्याची चर्चा गेल्या दोन दिवसांपासून राज्यासह देशभर सुरू होती.

रब्बी हंगामात प्रामुख्याने महाराष्ट्रात कांद्याचे उत्पादन घटण्याचा अंदाज आहे. देशभरातही चालू रब्बी हंगामात २.२७ कोटी टन कांदा उत्पादनाचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आणि गुजरातमधील कांदा उत्पादनाचा अंदाज घेतल्यानंतरच आंतर मंत्रालय समितीची बैठक होईल, त्यानंतर शेजारी आणि मित्र देशांना कांदा निर्यात करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो.

## आंदोलक शेतकरी आज दिल्लीकडे कूच करणार


नवी दिल्ली : रविवारी चौथ्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्र्यांनी कापूस, मका, तूर, उडीद आणि मसूर पिकांची पाच वर्षांसाठी हमीभावाने खरेदीचा प्रस्ताव शेतकरी नेत्यांना दिला होता. पण शेतकरी नेत्यांनी सोमवारीच हा प्रस्ताव फेटाळून लावला. शेतकरी आंदोलन बुधवारी दिल्लीकडे कूच करेल, अशी घोषणाही शेतकरी नेत्यांनी केली.

हमीभावाच्या कायद्यासाठी किसान संयुक्त मोर्चा (अ-राजकीय) आणि किसान मजूर मोर्चाने १३ फेब्रुवारीला 'दिल्ली चलो'ची हाक दिली. त्यानंतर तीन केंद्रीय मंत्र्यांच्या समितीने शेतकरी नेत्यांनी बैठक आयोजित केली. या बैठकीच्या चार फेऱ्या झाल्या पण त्यातून तोडगा निघाला नाही.

## बारावीची परीक्षा आजपासून

### गैरप्रकार रोखण्यासाठी व्यापक उपाययोजना

पुणे : राज्य मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा आज, बुधवारपासून सुरू होत असून ती १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थी देणार आहेत. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रश्र्नपत्रिकेचे लिफाफे ताब्यात घेतल्यापासून प्रश्र्नपत्रिका वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण करण्यात येणार असून वाहतुकीवेळी जीपीएस प्रणालीचा वापर केला जाणार आहे.



बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान होत आहे. यंदा विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की परीक्षा सुरक्षित वातावरणात होण्यासाठी संपूर्ण व्यवस्था करण्यात आली. यंदा पहिल्यांदाच प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ऑनलाइन पद्धतीने भरून घेतले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी राज्य मंडळ स्तरावरून १० समुदेशकांची, तर विभागीय मंडळांमध्ये जिल्हानिहाय दोन याप्रमाणे समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शुल्क भरले नाही किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र देण्यास टाळाटाळ करू नये, अशा सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, प्रवेशपत्र देण्यास टाळाटाळ केल्याच्या दोन तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांवर। पान २ वर

## जम्मू-काश्मीर प्रगतिपथावर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही

मुंबई : स्वत:च्या कुटुंबाचा विचार करणारे कधी इतरांच्या कुटुंबाचा विचार करत नाहीत. त्यामुळे परिवारवादी सरकारपासून लांब राहा. याउलट आमचे सरकार हे शेतकरी, युवाशक्ती यांना प्राधान्य देणारे आहे. त्याचाच दाखला जम्मू-काश्मीरमध्ये मिळतो. येत्या काही वर्षांत जम्मू-काश्मीरला विकसित करण्याचा संकल्प आहे आणि तो आम्ही पूर्ण करणार, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.



'आयआयटी मुंबई'च्या रिसर्च पार्क इमारतीचा उद्घाटनसह देशभरातील विविध उपक्रमांचा उद्घाटन सोहळा मंगळवारी पार पडला. यावेळी मोदी यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधला. संवेदनशील सरकार जेव्हा असते तेव्हा ते सगळ्यांचा विचार करून काम करते. सध्याचे सरकार हे संवेदनशील असल्याने आपला देश हा संतुलित विकासाच्या मार्गावर आहे. मागील दहा वर्षांत शैक्षणिक व्यवस्थेत अनेक बदल केले आहेत. हेच आधुनिक शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी आम्ही सतत प्रयत्न करत असतो, असे मोदी म्हणाले.

'आयआयटी मुंबई' येथे झालेल्या उद्घाटन सोहळ्यात खासदार मनोज कोटक, 'आयआयटी मुंबई'च्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. शरद सराफ, संचालक प्रा. सुभाषिश चौधरी, रिसर्च पार्क फाउंडेशनचे प्रभारी प्राध्यापक स्वरूप गांगुली आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) योजनेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी उद्घाटन झाले. या योजनेच्या प्रकल्प मंजुरी मंडळाने (पीएबी) देशातील ३५ विद्यापीठांना । पान २ वर

## ड्रायव्हिंग, लर्निंग आणि कंडक्टर लायसन्सची वैधता २९ फेब्रुवारीपर्यंत वाढवली

मुंबई : ज्यांच्या ड्रायव्हिंग लायसन्स, लर्निंग लायसन्स आणि कंडक्टर लायसन्सची वैधता संपत आहे अशा लोकांना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने मोठा दिलासा दिला आहे. आता परवान्याची वैधता कालावधी २९ फेब्रुवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने एक परिपत्रक जारी करून ही माहिती दिली आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने परिपत्रकात म्हटले आहे की, सारथी पोर्टल (https://sarathi.parivahan.gov. in) मध्ये पायाभूत सुविधांशी संबंधित कारणांमुळे, अर्जदारांना ३१ जानेवारी ते १२ फेब्रुवारी या कालावधीत अर्ज करण्याची परवानगी दिली होती. पण या दरम्यान परवाना संबंधित सेवा मिळविण्यात अडचणींना सामोरे जावे




लागेल.

आरटीओ कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी आणि सेवा सुरू ठेवण्यासाठी, पोर्टलवरील ऑनलाइन सेवा नागरिकांसाठी अंशतः डिसेबल करण्यात आल्या होत्या. जेणेकरून आरटीओ खाते सुरळीत काम करू शकेल. अशा परिस्थितीत ऑनलाइन सेवा अंशतः बंद झाल्यामुळे अनेक अर्जदार शुल्क भरू शकत नाहीत, ड्रायव्हिंग लायसन्सचे नूतनीकरण, शिकाऊ परवान्यासाठी बुक स्लॉट आणि ड्रायव्हिंग कौशल्य चाचणीसाठी अर्ज करू शकत नाहीत.वाहतूक पोर्टलवर नागरिकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने निर्णय घेतला आहे की शिकाऊ परवाना, ड्रायव्हिंग लायसन्स आणि कंडक्टर लायसन्स ज्यांची वैधता ३१ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत संपली । पान २ वर

## सोनिया गांधींची राज्यसभेवर बिनविरोध निवड!

नवी दिल्ली : काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यांनी राजस्थानच्या जयपूरच्या जागेवरून आपला उमेदवारी अर्ज भरला होता. वय तसेच आरोग्याच्या कारणामुळे त्यांनी लोकसभेची निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता.सोनिया गांधी या २००६ सालापासून रायबरेली या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत होत्या. २०१९ साली मोदी लाट असतानाही त्यांनी या मतदारसंघात विजयी कामगिरी केली होती. याच निवडणुकीत गांधी घरण्याशी संबंधित असलेल्या उत्तर प्रदेशमधील अमेठी या मतदारसंघातून काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांचा २०१९ सालच्या निवडणुकीत पराभव झाला होता. दरम्यान, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग हे राजस्थानमधूनच राज्यसभेवर निवडून गेलेले आहेत. त्यांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ येत्या एप्रिल महिन्यात संपणार आहे.



आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर सोनिया गांधी यांनी राज्यसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने त्यांच्या रायबरेली या लोकसभा मतदारसंघात कोणत्या काँग्रेस नेत्याला उमेदवारी मिळते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या महाराष्ट्रासह वेगवेगळ्या राज्यांतील ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार, २७ फेब्रुवारी रोजी निवडणूक होणार आहे.

## मराठी माणसाला मुंबईतून हद्दपार होऊ देणार नाही, देवेंद्र फडणवीस कडाडले

मुंबई : श्रमिकांनी श्रम करून बनवलेली ही मुंबई आहे. दहा-वीस टक्के लोक चकचकीत इमारतीत राहतात त्यांचीही मुंबई नाही. बीएमसीमध्ये काही लोकांनी राज्य केलं. त्यांनी फक्त आश्र्वासन दिली आणि वर्षानुवर्ष तीच आश्र्वासन द्यायची. निवडणुका संपल्या की त्यांना विसरून जायचं. २५ २५ वर्ष हे बघितलं. पण मागील दीड वर्षात आम्हाला संधी मिळाली आणि आम्ही जेवढे करता येईल तेवढं केलं. रक्ता माणसाची माणसं ही आमच्यासाठी महत्त्वाचे आहेत. एफएसआय आणि टीडीआर चे व्यवहार करणारे आमच्यासाठी महत्त्वाचे नाहीत. आम्ही मुंबईतील




मराठी माणसाला मुंबईतून हद्दपार होऊ देणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईत धन्यवाद देवेंद्रजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईतील मराठी माणूस स्वत:च घर का मिळवू शकत नाही. कोणत्या अडचणी येतात हे पाहून आपण शासन निर्णय घेतले. मात्र, २०१९ मध्ये आपलं सरकार गेलं. ज्यांनी वारंवार आम्ही मराठी माणसासाठी आहोत. मराठी माणसासाठी लढतो, अशा प्रकारच्या वल्गना केल्या त्यांच राज्य आल्यानंतर २०१९ चा हा शासन निर्णय त्यांनी गुंडाळून बाजूला ठेवला. त्यांनी बिल्डर धार्जिणे धोरण त्यांनी महाराष्ट्रात आणले. सामान्य मराठी माणसाचे स्वप्न त्यांनी गुंडाळून ठेवले.

देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले, आपल्या आशीर्वादाने शिंदे साहेबांच्या नेतृत्वात आपण पुन्हा काम सुरु केले. मुंबई, ठाण्यातील गृहनिर्माणाची परिषद दरेकर यांनी घेतली. बिल्डरांच्या जाळ्यातील सामान्यांना घर घेऊन देण्यासाठी काय करता येईल, यासाठी १६ मागण्या माझ्यासमोर ठेवण्यात आल्या. त्या सोळा मागण्या मी पूर्ण केल्या. जीआर काढला. शासन निर्णय काढला आणि अंमलबजावणी देखील सुरु केली. ती अंमलबजावणी झाल्याबद्दल धन्यवाद देवेंद्रजी हा कार्यक्रम घेतलाय, असेही फडणवीस यांनी नमूद केले.

फडणवीस म्हणाले, पुढील दहा वर्षांनी माझ्यासमोर बसलेला प्रत्येक माणसाला हक्काचा घर हे त्याचा असेल, अशा करिता मुंबईकरता तुमचा आशीर्वाद घ्यायला आलोय. तुमच्या आशीर्वादाची ताकद ही इतकी जबरदस्त आहे । पान २ वर

## लोकसभा स्वतंत्रपणे लढणार : राजू शेट्टी

कोल्हापूर : आगामी लोकसभा निवडणुकीत आम्ही स्वतंत्रपणे उतरणार आहोत. गतवेळी झालेल्या चुका विसरून कार्यकर्त्यांनी हातकणंगले लोकसभेच्या मैदानात अधिक जोमाने कामाला लागावे, अशी सूचना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी मंगळवारी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार असताना राजू शेट्टी यांनी ही घोषणा केली आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून राजू शेट्टी यांना उमेदवारी देण्याच्या हालचाली सुरू असताना याला महत्व आले आहे.यंदाची लढाई ही आरपारची लढाई आहे. सर्वसामान्य जनता आपल्या सोबत असल्याने यंदा आपण यश निश्र्चितच मिळवू असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

स्वाभिमानी शेतकरी संघटना व स्वाभिमानी पक्षाच्या वतीने हातकणंगले येथील मंगलमूर्ती मंगल कार्यालय येथे कार्यकर्ता मेळावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

# संपादकीय

## भाजपचा हा सुवर्णकाळ..

भाजपकडे येणाऱ्यांची रांग वाढत चालली आहे. २०२४ ची निवडणूक भाजपच्या व पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दृष्टीने प्रतिष्ठेची आहे. 'अबकी बार चार सौ पार' अशी घोषणा भाजपने दिली आहे. म्हणूनच भाजपची विचारधारा व मोदींचे नेतृत्व मान्य आहे, त्यांच्यासाठी पक्षाने दरवाजे खुले ठेवले आहेत. येत्या लोकसभा निवडणुकीत मोदी की गॅरंटी आणि राम मंदिर हे मुद्दे भाजपच्या प्रचारात आघाडीवर असतील. महाराष्ट्रातून एकनाथ शिंदे, अजित पवार आणि आता अशोक चव्हाण, उत्तर प्रदेशमधून जयंत चौधरी, बिहारमधून नितीश कुमार एनडीएच्या तंबूत येऊन दाखल झाले आहेत. आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, वायएसआर काँग्रेसचे जगन मोहन रेड्डी आणि पंजाबमधील अकाली दलाचे नेतेही भाजप श्रेष्ठींच्या संपर्कात आहेत. मोदी हे पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक करणार व त्यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सलग तिसऱ्यांदा एनडीएचे सरकार येणार असे देशात वातावरण आहे. दुसरीकडे भाजपविरोधी इंडिया आघाडीची रोज शकले पडत आहेत. म्हणूनच भविष्याचा विचार करून भाजपकडे येणाऱ्यांची गर्दी वाढत चालली आहे. दिवंगत पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांना भारतरत्न जाहीर झाल्यावर त्यांचे नातू जयंत चौधरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींविषयी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनीही लगेचच एनडीएकडे वाटचाल सुरू केली. पश्चिमी उत्तर प्रदेशात लोकसभेच्या २७ जागा असून १८ टक्के लोकसंख्या जाट आहे. चौदा मतदारसंघात जाटांचा प्रभाव आहे. राष्ट्रीय लोकदलामुळे या सर्व जागा भाजप-एनडीएला मिळू शकतील, असे गणित आहे. आंध्र प्रदेशात तेलुगू देसम व वायएसआर काँग्रेस हे दोन्ही पक्ष एनडीएमध्ये येण्यास उत्सुक आहेत. चंद्राबाबू नायडू व वायएस जगन मोहन रेड्डी हे भाजप श्रेष्ठींच्या संपर्कात आहेत. राम मंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा झाल्यापासून भाजपचा उत्साह गगनाला जाऊन भिडला आहे. दुसरीकडे खासदार राहुल गांधींची भारत जोडो यात्रा चालू असूनही काँग्रेसमध्ये नैराश्य आहे. काँग्रेसमधील दिग्गज नेते पाठोपाठ बाहेर पडून भाजपच्या छावणीत सामील होत आहेत. जम्मू-काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे ३७० कलमाचे कवच मोदी सरकारने काढून घेतल्यामुळे व अयोध्येतील राम मंदिरामुळे विरोधी पक्षातील अनेक दिग्गज नेते भाजपकडे आकर्षित होत आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक वेगाने वाढणारा पक्ष म्हणून भाजपचा हा सुवर्णकाळ आहे.

# स्वेरीत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती उत्साहात साजरी



पंढरपूर/प्रतिनिधीः 'छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व योगदान अवघ्या विश्र्वात पोहचले आहे परंतु त्यांची सक्षम प्रशासकीय व्यवस्था जी त्यांनी अत्यंत प्रभावीपणे राबविली हा त्यांच्या कार्यातील अतिशय महत्वाचा भाग आहे. शिवरायांचे मावळे एवढे एकनिष्ठ होते की ते अखेरच्या श्र्वासापर्यंत कोणाच्याही आणि कोणत्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत. कोणत्या ठिकाणी कोणत्या कामगिरीसाठी कोणता सैनिक नेमावा? हे राजांकडून शिकावे. कोंडाजी फर्जद यांना लढायला जाण्यापूर्वी त्यांना सोन्याचे कडे बक्षीस म्हणून दिले. यावरून 'माणूस जिवंत असताना त्यांचा सन्मान करणे' राजांना खुप महत्वाचे वाटत असायचे. यावरून राजांच्या विचारांतील कल्पकता व नेतृत्वक्षमता समजते. त्यांनी मावळ्यांना स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागणूक दिली, आणि त्यांना जपले. त्यामुळे मावळ्यांच्या अंगी स्वराज्याबाबत आपलेपणाची भावना निर्माण झाली. एकूणच राजांनी सर्व मावळ्यांच्या अंतःकरणात राष्ट्रनिष्ठा पेरली होती म्हणून हिंदवी स्वराज्य निर्माण झाले.' असे प्रतिपादन पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. स्वामीराज भिसे यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मध्यवर्ती असलेल्या भव्य ओपन एअर थिएटरमध्ये आयोजिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ व्या जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. स्वामीराज भिसे हे आपले विचार मांडत होते.

त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे 'प्रभावी प्रशासन' या विषयावर अतिशय मौल्यवान विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मंत्रालयातील सचिव आनंदराव माळी हे होते तर विशेष अतिथी म्हणून विवेकवर्धिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.आर.मुंडे हे उपस्थित होते. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर प्रास्तविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज हे उत्तम प्रशासक होते त्यामुळे ते परिस्थिती पाहून निर्णय घ्यायचे. निर्णय घेताना त्यांनी भावनिकतेला कुठेही थारा दिला नाही. आपल्याला यशस्वी जीवन जगायचे असेल तर त्यांच्या विचारांचा ठेवा आपण जपला पाहिजे.' असे सांगून महाराजांच्या जीवनावर, शौर्यावर, कार्यावर, नेतृत्वावर आणि नियोजनावर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे प्रा. भिसे पुढे म्हणाले की, 'रयतेच्या भाजीच्या देठाला सुद्धा हात लावता कामा नये हा आदेश देणारे छत्रपती शिवाजी राजे हे 'लोकपालक' होते. राजांच्या सुव्यवस्थित प्रशासनामुळे समाजात शेतकऱ्यांचे सन्मानाचे स्थान प्राप्त झाले. एखादा मावळा शहीद झाला तर त्याच्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी राजे स्वतः घेत असत. यासाठी त्यांनी विविध योजना अंमलात आणल्या. राजांनी नेहमी दूरदर्शी विचारसरणी ठेवून कार्य केले. राजांचे स्वराज्य हे त्यांच्या व मावळ्यांच्या भव्य दिव्य योगदानातून उभे राहिले कारण राजांच्या विचारांना विवेकाची जोड होती. म्हणून राजांची 'प्रशासकीय व्यवस्था' अत्यंत महत्त्वाची वाटते.' यावेळी साईराम कलुबर्मे, साक्षी हुके, कल्याणी कुंभार, क्षितिजा हुराडे, गायत्री जाधव, सुमित बागल व मयंक लोटके यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी शिवरायांची महती सांगणारी भाषणे केली. यावेळी विवेकवर्धिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.आर.मुंडे यांना भारत सरकारने मानद पदवी बहाल केल्यामुळे त्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ.मुंडे म्हणाले की, 'ग्रामीण भागातील विद्यार्थी हा चांगला घडावा यासाठी डॉ. रोंगे सरांनी याठिकाणी ज्ञानगंगा आणली. सुरुवातीपासून अनेक वादळे आली पण स्वेरीची घोडदौड कोणीही थांबवु शकले नाही आणि भविष्यातही कोणी थांबवु शकणार नाही. डॉ.रोंगे सर हे खूप बारकाईने अभ्यास करून त्यावर निर्णय घेतात. आपला वेळ कशासाठी असावा आणि त्याचा वापर कसा करावा हे मी डॉ.रोंगे सरांकडून शिकलो. हे कार्य करण्याची प्रेरणा मी रोंगे सरांकडून घेतली.' अध्यक्षस्थानावरून बोलताना मंत्रालयातील सचिव आनंदराव माळी म्हणाले की, 'शिवरायांच्या काळातील सैन्य, मावळे हे एकनिष्ठ होते, जिवाभावाचे होते. त्याउलट शत्रूचे सैन्य होते. यासाठी मित्र जमवताना देखील चांगल्या मित्रांमध्ये राहता आलं पाहिजे. यासाठी सहकारी देखील महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध असावे व शालेय जीवनात मोबाईलचा वापर कमीत कमी करावा. येथील विद्यार्थ्यांनी एमपीएससी व यूपीएससीच्या अधिक स्पर्धा परीक्षा देण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी प्रशासकीय सोई सुविधांचा लाभ घ्यावा.

एकूणच जीवनात यशस्वी होण्यासाठी आपण वेळ कुठे घालवला पाहिजे आणि कुठे घालवितो याची जाणीव असली पाहिजे.' स्वेरीच्या ख्याती बद्दल बोलताना पुढे ते म्हणाले की, 'माझा भाऊ अमर हा देखील स्वेरीचा माजी विद्यार्थी असून त्याने मेकॅनिकल इंजिनिअरिंग मधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याला नोकरीच्या अनेक संधी मिळाल्या. गेट या परीक्षेत ९९ पेक्षा जास्त स्कोअर घेऊन आज तो एका मोठ्या कंपनीमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या करिअर मध्ये स्वेरी अतिशय भरीव असे कार्य करत आहे.' यावेळी आर्किड इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ.जे. पी. दफेदार, स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट, खेड चे प्राचार्य डॉ.एस. एस. पाटील, भीमराव जाधव, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्र्वस्त धनंजय सालविठ्ठल, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्र्वस्त प्रा. सी.बी. नाडगौडा, विश्र्वस्त एच.एम.बागल, विश्र्वस्त बी.डी.रोंगे, श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्र्वस्त सौ. प्रेमलता रोंगे, युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, इंजिनिअरिंग व फार्मसीचे स्टुडंट कौन्सिलचे सचिव आदित्य जगदाळे, पूजा बत्तुल आणि इंजिनिअरिंग व फार्मसीमधील चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. आदित्य भुसनर व डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी आभार मानले.

## भिमनगर मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती उत्साहात साजरी




ईटकुर/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे रयतेचे राजे, हिंदवी स्वराज्य संस्थापक,आदर्श राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळेस छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची कामगिरी ज्येष्ठ नेते आत्माराम रणदिवे यांनी सांगून, प्रतिमेची पुष्प हार घालून पूजा करण्यात आली.या कार्यक्रमाला

आत्माराम रणदिवे, मिलिंद रणदिवे, सुधाकर रणदिवे ,एल डी शिंदे, अमोल रणदिवे, छत्रभुज रणदिवे, प्रेमकुमार शिंदे, बाबासाहेब शिंदे, दत्ता शिंदे,निलेश शिंदे, यशपाल लोंढे,भोलेनाथ शिंदे, बाळासाहेब शिंदे, उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष,आदित्य रणदिवे निलेश शिरसट, रोहीत रणदिवे, नाना लगाडे, सुयश रणदिवे,सौरभ शिंदे, अनुज लगाडे,यांनी केले होते.यावेळेस शाळेतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर, गावातील सर्व शिवप्रेमी व भिमनगर मधील सर्व भीमसैनिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशात गुप्तचर यंत्रणेची भूमिका महत्त्वाची : प्रा.डॉ.हनुमंत लोंढे

पंढरपूर/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या बुद्धी, चातुर्य आणि युक्तीच्या बळावर गनिमी कावा ही युध्दनीती विकसित केली. बलाढ्य असणाऱ्या शत्रूला नामोहरम करून स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या या यशात त्यांनी निर्माण केलेली गुप्तचर यंत्रणा ही वैशिष्ट्यपूर्ण होती. बहिर्जी नाईक सारखा उपेक्षित माणूस या गुप्तचर यंत्रणेचा प्रमुख होता. अफजलखान वध, पन्हाळगडाचा वेढा, आग्र्याहून सुटका, शाहिस्तेखानावर स्वारी आणि सुरतेची लुट या आणि अशा प्रत्येक प्रसंगात गुप्तचर संघटनेची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. असे प्रतिपादन इतिहास विभाग प्रमुख प्रो. डॉ. हनुमंत लोंढे यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंती निमित्त आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज यांची गुप्तहेर यंत्रणा' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, पर्यवेक्षक प्रा. युवराज औताडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती विभाग प्रमुख डॉ. रविराज कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील गड आणि किल्ले यांची माहिती देणाऱ्या पोष्टर्सचे प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमास सिनिअर, ज्युनिअर, व्होकेशनल विभागातील शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भारती सुडके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी, प्रा. कल्याण वटाणे, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. डॉ. उमेश साळुंखे, प्रा. बाळू गायकवाड, ओंकार नेहतराव, अभिजित जाधव, अमोल माने यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांचे आभार समारंभ समितीचे प्रमुख प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले.

पान १ वरुन

## मराठा समाजाला १०..

शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचे सिद्ध झाले आहे. मराठा समाजाची लोकसंख्या २८ टक्के गृहीत धरून मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गात आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार सरकारने नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देणारे विधेयक पहिल्यांदा विधानसभेत मांडले. त्यानंतर विधेयक विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले. विधानपरिषदेतही विधेयक बहुमताने मंजूर झाले.

राज्य सरकारने ओबीसीतून नव्हे तर मराठा समाजाला स्वतंत्रपणे आरक्षण देणारे विधेयक आणले आहे. त्यात देण्यात आलेले १० टक्के आरक्षण हे आधीच्या ५२ टक्के आरक्षणाच्या व्यतिरिक्त आहे. त्यामुळे आधीचे ५२ टक्के, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केंद्राचे १० टक्के आरक्षण पाहता आता राज्यातील आरक्षणाची टक्केवारी ७२ टक्के होणार आहे. मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाला स्वतंत्र नव्हे तर ओबीसी प्रवर्गात आणि ५० टक्क्यांच्या आत आरक्षण देण्याची मागणी केली होती. मात्र राज्य सरकारने ही मागणी अमान्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्य सरकारने ५० टक्क्यांच्या बाहेर आणि स्वतंत्र प्रवर्ग तयार करून मराठा समाजाला आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले आहे.

## बारावीची परीक्षा आजपासून

कारवाई केली जाणार आहे, असेही गोसावी यांनी सांगितले.

यंदा राज्य मंडळाने अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाइन प्रणालीद्वारे नोंदवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रचलित पद्धतीच्या तुलनेत ऑनलाइन प्रणालीमुळे काम अधिक वेगाने होणार आहे. त्याचा परिणाम निकाल तयार करण्याच्या प्रक्रियेवरही होऊ शकतो. त्यामुळे मे अखेरीपर्यंत बारावीचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर १० मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी सकाळच्या सत्रात साडेदहा वाजता, दुपारच्या सत्रात अडीच वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहायचे आहे. परीक्षेची वेळ सुरू झाल्यावर प्रवेश दिला जाणार नाही, असे गोसावी यांनी सांगितले.

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या वारंवार आंदोलन करूनही मान्य झालेल्या नाहीत. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार घातल्याची माहिती कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंदळकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

## जम्मू-काश्मीर प्रगतिपथावर,

बहु-विषय शिक्षण व संशोधन विद्यापीठे (एमईआरयू) या घटकाखाली १०० कोटी रुपये आणि ७३ विद्यापीठांना विद्यापीठांचे बळकटीकरण या घटकाखाली प्रत्येकी २० कोटींचे अनुदान दिले आहे. राज्यातील पहिले आणि भारतातील दुसरे समूह विद्यापीठ असलेल्या मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठास 'पीएम-उषा'अंतर्गत 'ग्रॅन्टस टू स्ट्रेंथन युनिव्हर्सिटीज' (जीएसयू) या घटकाखाली २० कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या अनुदानाच्या माध्यमातून गुणवत्ता वाढविणे, प्रवेशाचा विस्तार करणे, नवीन तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमाची निर्मिती, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन प्रोग्रामिंगसारख्या भविष्यातील तंत्रज्ञानातील अद्वितीय शैक्षणिक अभ्यासक्रम व सामाजिक विज्ञान, वाणिज्य व बँकिंगमधील ट्रान्सडिसिप्लिनरी अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. तसेच ई-ग्रंथालय सुविधा, स्टार्ट-अप, संगणकीकृत समुपदेशन आणि मार्गदर्शन केंद्राची स्थापना आदी सुविधा पुरवल्या जाणार आहेत, अशी माहिती डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी दिली.

## ड्रायव्हिंग, लर्निंग आणि कंडक्टर

आहे, त्यांच्यावर कोणताही दंड न आकारता २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत वैध मानले जाईल. अशी कागदपत्रे २९ फेब्रुवारीपर्यंत वैध मानावीत अशा सूचना अंमलबजावणी अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. मंत्रालयाला मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या ज्यात परिवहन पोर्टलवर बरेच लोक अर्ज करू शकत नसल्याचे सांगण्यात आले होते.त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

तुम्हाला शिकाऊ परवान्यासाठी (Lerning Licence) अर्ज करायचा असेल किंवा कायमस्वरूपी परवाना मिळवायचा असेल तर तुम्ही अगदी सहज ऑनलाइन अर्ज करू शकता. तर आता शिकाऊ परवाना मिळवण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन झाली आहे. तसेच, शिकाऊ परवाना डिजिटल पद्धतीनं मिळू शकतो. तर कायमस्वरूपी परवाना मिळवण्यासाठी आरटीओला जावं लागतं.

कायमस्वरूपी परवाना घेण्यासाठी परिवहन कार्यालयात जावं लागतं. शिकाऊ परवान्यासाठी अर्ज करण्यासाठी, सर्वप्रथम अधिकृत साइटला भेट द्या. (https://sarathi.parivahan.gov.in/sarathiservice/stateSelection.do). येथे तुम्हाला एक संपूर्ण यादी मिळेल ज्यामध्ये तुम्हाला ङशरीपशी ङळलशपीश चा पर्याय निवडावा लागेल. येथे तुम्हाला आधारचा पर्यायही दिसेल. तिथे तुम्हाला तुमच्या आधार कार्डाचे तपशील टाकावे लागतील. यासोबतच मोबाईल नंबरवर एक ओटीपीही येईल. सर्व तपशील टाकल्यानंतर तुम्हाला पेमेंट पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर तुम्हाला ५० रुपयांची फी भरावी लागेल. तुम्ही या प्रक्रियेद्वारे अर्ज केल्यास लर्निंग ड्रायव्हिंग लायसन्स फक्त ७ दिवसांत थेट तुमच्या घरी पोहोचेल.

## मराठी माणसाला मुंबईतून हद्दपार होऊ

की हे परिवर्तन आम्ही करून दाखवू. अभयदय नगरचा सीएनडीचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे इथे येण्याआधी मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. ती फाईल आपण संपूर्ण पूर्ण केली आहे सर्व काम केलं आहे. ती फाईल कॅबिनेट पर्यंत पोहोचवली आहे आणि मला मुख्यमंत्री म्हणाले की, माझ्या वतीने तुम्ही घोषणा करा की पुढच्या कॅबिनेटमध्ये अभ्युदय नगरच्या सीएनडीचा विकास करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, राज्य शासनाने घेतलेल्या स्वयंपुनर्विकासाच्या निर्णयामुळे किमान २५ हजार वसाहती म्हणजेच साधारणपणे ५ लाख घरांची निर्मिती होणार आहे. तीन पिढ्यांपासून घराचे स्वप्न पाहणाऱ्या मराठी माणसांचे घराचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे. बीडीडी चाळींचा बिल्डरांकडून नव्हे तर म्हाडाकडून विकास करण्याचा निर्णय घेतला. १०० स्क्वेअर फुटाच्या घरामध्ये राहणाऱ्यांना ५६० स्क्वेअर फुटांचे घर दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

अभ्युदयनगरच्या सीएनडीच्या विकासाचा प्रस्तावही लवकरच मंत्रिमंडळासमोर ठेवला जाणार आहे. त्याचबरोबर गृहनिर्माण संस्थांच्या विविध मागण्या, प्रश्र्नांबाबत राज्य शासन सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान १७ पोलीस वसाहती म्हाडाकडून विकसित केल्या जाणार असून बांद्रा रिक्लमेशन, आदर्शनगर वरळी, पीएमजीपी कॉलनी पुनमनगर, अंधेरीतील वसाहतींच्या विकासाचे प्रश्र्न लवकरच मार्गी लावले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# माघी यात्रेमध्ये चंद्रभागेच्या तिरी भक्तांचा महासागर

पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटील: पंढरीतील मागे यात्रा सोहळ्याच्या निमित्ताने चार ते पाच लाखाहून पंढरी नगरीत मंगळवारी मागे यात्रेची जया एकादशी असल्याने चार ते पाच लाख भाविकांनी दर्शनासाठी पंढरपूर नगरीमध्ये लगभग चालू आहे दरम्यान दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्यामुळे चंद्रभागेचे पात्र कोरडे पडले आहे भाविकांना चंद्रभागेचे स्नान करता येत नसल्यामुळे भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे

पंढरपूर मध्ये वर्षातून चार यात्रा असते त्यामध्ये मागे वारीमध्ये मोठ्या प्रमाणात जनावरांचा बाजार सुद्धा वाखरी येथे भरत असतो बाजारामध्ये हजारो खिलारी गाईंचा व मशीन चा बाजार मोठ्या प्रमाणात भरत असतो त्याचप्रमाणे यावर्षी चार ते पाच लाख भाविक पंढरपूर मध्ये दाखल झाले आहेत दर्शनाची बारी आता गोपाळ पुढच्या पुढे गेले आहे दर्शनाला भाविकांना दहा ते बारा तास लागत आहेत भाविकांना दर्शन रांगेत चहापाणी नाश्ता व पाण्याची सोय करण्यात आले त्याचप्रमाणे जेवणाची ही सोय करण्यात आलेली आहे

यावर्षी पहिल्यांदाच दर्शन रांगेमध्ये भाविकांना चहापाणी नाश्ता व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे पंढरपुरात विठुरायाच्या दर्शनासाठी गेले दोन दिवसापासून भाविकांनी पंढरपूरमध्ये गर्दी केलेली आहे टाळ मृदुंग व भगव्या पताका यांनी पंढरी नगरी गजबूजून गेलेली आहे भाविकांनी स्नान करण्यासाठी चंद्रभागेच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी केलेली आहे चंद्रभागेला पाणी नसल्यामुळे भाविकांची होत आहे

भाविकांनी पंढरपूर नगरीमध्ये पंढरी नगरीमध्ये भावुक यांनी दोन ते तीन दिवस झाले मोठ्या प्रमाणात गर्दी केलेली आहे तरी पंढरपुरामध्ये चोपाळा स्टेशन रोड नाथ चौक प्रदक्षणा मार्ग बाजूला चौक भाविकांनी हरी नामाच्या गजानन पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे



## राजधानीत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी



नवी दिल्ली : आद्य पत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्र येथे आज साजरी करण्यात आली. कॉपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात अपर निवासी आयुक्त श्रीमती नीवा जैन यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहायक निवासी आयुक्त श्रीमती स्मिता शेलार, डॉ. प्रतिमा गेडाम यांच्यासह महाराष्ट्र सदनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.महाराष्ट्र परिचय केंद्रात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन महाराष्ट्र परिचय केंद्रात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. परिचय केंद्राच्या उपसंचालक (माहिती) अमरज्योत कौर अरोरा यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

# समाज नाचायला नाही तर वाचायला शिकवण्याचं काम विठ्ठल प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत आहे : शिवव्याख्याते यशवंत गोसावी

पंढरपूर/प्रतिनिधीः छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त तिसर्या दिवशी व्याख्याते श्री.यशवंत गोसावी याचं व्याख्यान शिवतीर्थ, पंढरपूर येथे संपन्न झाले. शिवरायांचा धगधगता इतिहास समाजापुढे मांडून समाजाला दिशा देण्याचे कार्य या व्याख्यानातून साध्य झाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचे आणि विचारांचे दर्शन जीवनातील यश मिळविण्यासाठी प्रेरणादायी ठरते. शिवरायांचे जीवन आणि विचार दर्शन घडवण्याचा हेतू या व्याख्यानमालेने पूर्ण होत आहे.

पंढरपूरकरांनी १५ ते १७ अशा तीन दिवसीय व्याख्यानमालेस उदंड प्रतिसाद दिला.

पंढरपूर मधील नागरिकांसाठी सातत्याने काही नावीन्यपूर्ण उपक्रम आयोजित करण्यासाठी पुढाकार घेणारे श्री.अभिजीत आबा पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे आणि आचाराचे दर्शन घडवणाऱ्या व्याख्यानमालेचे आयोजन सुरू केले. गेली अनेक वर्षे ते हा उपक्रम यशस्वीरित्या आयोजित करत असून त्याचा प्रत्यक्ष परिणाम पुढील पिढीवर होईल हा विश्र्वास आहे.

या अभिनव उपक्रमाचे पंढरपूरवासियांकडून तर कौतुक होतच आहे, परंतु सुप्रसिद्ध वक्त्यांनी देखील श्री.अभिजीत आबा पाटील यांच्या कार्याची विषेश दखल घेतली आहे. आज छत्रपती असते तर बंद पडलेले कारखाने सुरू करण्यासाठी (लोकांच्या हिताचे) अभिजीत पाटील यांना सोन्याचे कडे दिले असते असा गौरवपूर्ण उल्लेख शाहीर राजेंद्र कांबळे यांनी केला.

आता या अभिनव व्याख्यानमालेतील पुढील व्याख्यान प्रेरणादायी वक्ते प्रा.नितीन बानगुडे पाटील यांचे आयोजित करण्यात आले आहे. कासेगाव येथे दिनांक २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ०६:०० वाजता सर्वांनी मोठ्या संख्येने या प्रेरणादायी व्याख्यानाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे

.यावेळी मा.नगराध्यक्ष, शहराध्यक्ष सुभाष भोसले, स्वेरीचे सचिव डॉ.बी.पी.रोंगेसर, दिपक पवार, मधुकर आबा नाईकनवरे, आनंद माळी, काशिद रावसाहेब, तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, सुरजनाना भोसले, व्हाईस चेअरमन प्रेमलता रोंगे, संचालिका सविता रणदिवे, शुभांगी भुईटे, मुंढे मॅडम, चारूशिला कुलकर्णी, संचालक तानाजी बागल, सचिन पाटील यासह आदी मान्यवर उपस्थित होते..



## संचालक माहिती कार्यालयात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर : दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त संचालक माहिती कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांनी आचार्य जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सहायक अधीक्षक प्रवीण भानेगावकर, प्रदर्शन सहायक राजेंद्र वाणी, वरिष्ठ लिपिक प्रकाश राऊत, प्रतीक्षा शेजुळ, इंदुबाई गावंडे, दशरथ वानोळे, संजय परदेशी, राहुल तोनगिरे, पांडुरंग जाधव, सुनील चौधरी, गणेश सुरासे, शेषराव पवार, अब्दुल रहेमान, अनिल बिरोटे, अशोक सुरडकर, यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# सत्तेचा दुरुपयोग करून विरोधकांची नाकेबंदी सुरू; शरद पवार यांची टीका

कोल्हापूर : देशात सत्तेचा दुरुपयोग करून विरोधकांची नाकेबंदी केली जात आहे. या विरोधात पुरोगामी विचारांच्या संघटनांनी आवाज बुलंद केला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी येथे केले. कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांच्या स्मारकाचे लोकार्पण ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, कॉ. भालचंद्र कांगो, विजय देवणे, स्मिता पानसरे यांची भाषणे झाली.पवार पुढे म्हणाले, फुले, शाहू,आंबेडकर यांनी पुरोगामी विचार जपला. तो आपण सर्वांनी पुढे नेण्याची जबाबदारी निभावली पाहिजे. देशात मोठा संघर्ष उभा आहे. या विरोधात समविचारी पक्षांना, संघटना एकत्र करीत आहोत. गोविंद पानसरे यांचे स्मारक पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक राहील.

खासदार डी. राजा यांनी आज मोदी गॅरंटीची भाषा केली जात आहे पण यांनी दोन कोटी तरुणांना रोजगार, १५ लाख रुपये देण्याचे आश्र्वासन कोठे विरले हे विचारले पाहिजे. आगामी लोकसभा निवडणुकीत संविधान वाचवण्यासाठी भाजपच्या प्रतिगामी शक्तींना पराभूत केले पाहिजे.माजी मंत्री, आमदार बाळासाहेब थोरात यांनी सध्या सत्तेत असणारे राज्य घटनेमुळेच आले असतानाही ते घटनेच्या मुलभूत तत्त्वांनाच तिलांजली देत आहेत. गोविंद पानसरे यांनी पुरोगामी विचार कायम जपला असताना तो संपवण्यासाठी एक यंत्रणा काम करते आहे. विचारवंतांचे विचार आणि कृतीचे समाजाच्या उभारणीत मोठे योगदान असते.आमदार सतेज पाटील यांनी, अमृतकालाच्या नावाखाली जातीयवादाचा विचार पेरला जात असताना तो हाणून पाडण्यासाठी पुरोगामी शक्तींनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने साजरी




अक्कलकोट/प्रतिनिधीः सी,बी खेडगी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन मा.तालुका अध्यक्ष रविराज पोटे, गंगाराम वाघमारे, साहिल कांबळे, आकाश बनसोडे, महेश बनसोडे, ईशा गायकवाड, सुमित चौधरी, विशाल सिंदखेड, सौरभ बनसोडे, जयभिम किनगी, राकेश कुरणे आदीसह विद्यार्थी उपस्थित होते

# शिवजयंती निमित्त स्वेरीतील २७१ जणांनी केले ऐच्छीक रक्तदान

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंतीचे औचित्य साधून आयोजिलेल्या रक्तदान शिबीरात डिप्लोमा इंजिनिअरिंगचे ८७ व डिग्री इंजिनिअरिंगचे १८४ रक्तदाते असे मिळून एकूण २७१ विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ऐच्छीक रक्तदान केले.

'शिवजयंती'च्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा.स्वामीराज भिसे यांच्या हस्ते व मंत्रालयातील सचिव आनंदराव माळी, विवेकवर्धिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.आर.मुंडे, आर्किड इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ.जे. पी. दफेदार, भीमराव जाधव, स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, विश्र्वस्त बी.डी.रोंगे, श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्र्वस्त सौ. प्रेमलता रोंगे, युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रविकांत साठे, डॉ. एम.एम. आवताडे, डॉ.डी.एस.चौधरी, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, इंजिनिअरिंग व फार्मसीचे स्टुडंट कौन्सिलचे सचिव आदित्य जगदाळे, पूजा बत्तुल आणि इंजिनिअरिंग व फार्मसीमधील विद्यार्थी यांच्या उपस्थितीत या रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी अक्षय ब्लड बँक, सोलापूर या रक्तपेढीला आमंत्रित केले होते. रक्तपेढीच्या प्रमुख डॉ. सोनिया शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांचे जनसंपर्क अधिकारी सागर जाधव व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हे रक्तदान शिबिर घेण्यात आले.

# भिवंडी तालुक्यातील भिवाली येथे आदीवासी सांस्कृतिक व कला क्रिडा महोत्सव उत्साहात साजरा

## तारपा, गवत्या नृत्या मधून आदिवासी संस्कृतीला दिला उजाळा

भिवंडी/ मिलिंद जाधव :आदिवासी संस्कृतीला उजाळा मिळावा व आदिवासी बांधवांची संस्कृती जोपासली जावी म्हणून आदिवासी क्रांती सेना यांच्या वतीने आदीवासी सांस्कृतिक व कला क्रिडा महोत्सवाचे आयोजन दिनांक १७ ते १८ फेब्रुवारी २०२४ रोजी भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी भिवाळी, (भाऊराव पाटील मैदान) येथे करण्यात आले होते.




आदिवासी सांस्कृतिक व कला क्रिडा महोत्सवात विविध कला कृतीच आयोजन नागरीकांना बघायला मिळाल असून ,आदिवासी संस्कृतीला उजाळा देणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.आहेत.आदिवासी जीवन ,आदिवासी कसे राहायचे, निसर्ग देखावा, त्यांची संस्कृती तसेच निसर्ग देखावा, जुनी अवजारे, बियाणे, पर्यावरणाची निगा कशी राखावी तर जुनी अवजारे , बैलागाडी यांचे प्रदर्शन लावण्यात आले होते.

तसेच सावित्रीबाई फुले यांची शाळा उभारून शिक्षणाचा सामाजिक संदेश देण्यात आला. आदिवासी समाजावरील गाणे तसेच तारपा ,गवत्या, नृत्य तर इतर नृत्य सादर करण्यात आली असून प्रेक्षकांची मने जिंकली. गोल्डन स्टार ऑर्केस्ट्राच्या सोबतीला फेमस गायक जगदीश पाटील, वैष्णवी पाडेकर, दयानंद म्हस्कर , सतिश विशे यांनी गिते सादर केली. या आदिवासी महोत्सवात गायक जगदीश पाटील यांना कला क्षेत्रातील तर आदिवासी क्रांती सेनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अनिल भांगले यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल आयोजकांच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

तर सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नागरिकांना सन्मानित करण्यात आले. यावेळी ठाणे, पालघर जिल्हातून नागरिकांनी हजेरी लावली होती.

आपल्या आई वडिलांनी कोणत्या अवजारे वापरून शेती तसेच कष्ट केले या प्रदर्शनातुन मांडण्यात आल होतं

काळातराने या गोष्ट हळूहळू नष्ट होणार आहेत म्हणून या गोष्टीची आठवण तसेच येणाऱ्या नवीन पिढीला या गोष्टींची आपल्या संस्कृतीची माहिती व्हावी तसेच प्रत्येक समजाच प्रबोधन व्हाव व आदिवासी सांस्कृतिक महोत्सव पाहणारा प्रत्येक व्यक्ती एक सामाजिक संदेश घेऊन जावा असे या कार्यक्रमाचे आयोजक आदिवासी क्रांती सेनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आनिल भांगले व आदिवासी सांस्कृतिक कला संवर्धन फाऊंडेशन महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष संतोष पाडेकर यांनी बोलताना सांगितले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक आदिवासी क्रांती सेनेचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आनिल भांगले व आदिवासी सांस्कृतिक कला संवर्धन फाऊंडेशन महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष संतोष पाडेकर, बबलू पाटील, सुनिल भांगरे ,मिलिंद राऊत ,दयानंद म्हसकर ,आत्माराम पाटील , संतोष मिस्त्री गेणेश हाडल, निलेश जाधव, साई भोईर, दीपक धोदडे, पार्थ पाडेकर,मंगल बरफ यांनी मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद जाधव, मनोज बुंधे, आत्माराम पाटिल यांनी केले.

# पोस्टाच्या विविध योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा

## पुणे रिजनचे पोस्टमास्तर जनरल रामचंद्र जायभाये

### पंढरपूर डाक विभागासारखे उत्कृष्ट काम इतर डाक विभागाने करावे




पंढरपूर/प्रतिनिधीः पोस्टाच्या विविध योजना सर्वसामान्य ग्राहकांपर्यंत पोहचविण्याचे उत्कृष्ठ काम पंढरपूर डाक विभागाने केलेले आहे. त्यामुळे या डाक विभागातील अधिकारी आणि कर्मचारी हे अभिनंदनास पात्र आहेत. पंढरपूर डाक विभागासारखेच उत्कृष्ठ काम इतर ठिकाणच्या डाक विभागाकडून देखील अपेक्षीत आहे. नागरिकांसाठी पोस्टाच्या विविध योजना सुरु असून नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे रिजनचे पोस्टमास्तर जनरल रामचंद्र जायभाये यांनी केले.

अधीक्षक डाकघर पंढरपूर यांच्या तर्फे विविध उपक्रम, विविध प्रकारच्या कार्यशाळा आणि कर्मचारी सन्मान सोहळयाचे पंढरपूर अर्बन बँकेच्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे रिजनचे पोस्टमास्तर जनरल श्री जायभाये बोलत होते. यावेळी इंडिया पोस्ट पेमेंट बँकेचे पुणे रिजनचे चीफ मँनेजर रोहितकुमार बर्नवाल, पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर, इंडिया पोस्ट पेमेंट बँक मँनेजर विनायक पासंगराव, प्रणव परिचारक, तसेच डाक विभागातील अधिकारी, कर्मचारी व पोस्टमास्तर उपस्थित होते.

यावेळी पुणे क्षेत्राचे पोस्टमास्तर रामचंद्र जायभाये यांनी डाक विभागाच्या महिला सन्मान बचत योजना, सुकन्या समृध्दी योजना, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, ग्रामीण पोस्टल लाईफ इन्शुरन्स, पोस्टाच्या मुदत ठेव योजना, मासिक प्राप्ती योजना, आधार सेवा, जनरल इन्शुरन्स, प्रिमियम खाते, मर्चंट खाते, अंन्त्योदय श्रमिक सुरक्षा योजना आदी विविध योजनांची माहिती आणि त्यांचे फायदे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अंत्योदय श्रमिक सुरक्षा योजनेत २८९ रुपयांमध्ये पाच लाख रकमेचा आणि ४९९ रुपयांमध्ये दहा लाख रुपये रकमेचा अपघाती विमा आणि इतर फायदे यामध्ये लाभार्थ्यास मिळणार असल्याची माहितीही श्री. जायभाये यांनी दिली.

केंद्र शासनाकडून शेतकऱ्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना पंढरपूर डाक विभागाकडून थेट त्यांच्या बांधावर जावून आपल्या इंडिया पोस्ट पेमेंट बँके मार्फत पैसे दिले जात असल्याची अभिमानास्पद कामगिरी केली जात असल्याची माहिती इंडिया पोस्ट पेमेंट बँकेचे पुणे रिजनचे चीफ मँनेजर रोहितकुमार बर्नवाल यांनी यावेळी दिली.

प्रारंभी पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर यांनी पंढरपूर विभागाने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला. यावेळी वेळापूर येथील डाकसेवक अनंत क्षीरसागर आणि पुरंदावडे येथील पोस्टमास्तर प्रदीप वाघमोडे या दोघांनी जनरल इन्शुरन्स आणि पोस्टाच्या बचत योजना मध्ये केलेल्या विशेष कामगिरी बद्दल त्यांचा रामचंद्र जायभाये यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डाक विभागाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत कर्मचाऱ्यांना देखील मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देवुन गौरविण्यात आले.

यावेळी मुख्यालयातील सहाय्यक अधीक्षक एम.एम.पाटील यांनी सर्व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित आलेल्या कार्यशाळेत प्रिव्हेन्शन ऑफ फ्रॉड या विषयावर तर गीताजंली उपाध्याय यांनी सॉफ्ट स्कील या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वसुमती वाले आणि आनंद जगताप यांनी केले. पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक चंद्रकांत भोर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी मुख्यालयातील सहाय्यक अधीक्षक एम.एम.पाटील, उत्तर उपविभागाचे सहाय्यक अधीक्षक राजकुमार घायाळ, करमाळा येथील उपविभागीय डाक निरीक्षक नदीक शेख, मंगळवेढा येथील डाक निरीक्षक हाजिरा शेख आणि अधीक्षक कार्यालय व पंढरपूर मुख्यालया मधील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# निफाड येथे दिनांक २४ फेब्रुवारीला श्री खंडेराव महाराज यात्रोउत्सव



निफाड : निफाड परिसराचे आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यात्रा उत्सव दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ पासून प्रारंभ होणार असून सालाबाद प्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे,

दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात रथांचा लिलाव करण्यात आला असून या रथांच्या लिलावा चे मानकरी यात्रा कमिटी अध्यक्ष मा.नगरसेवक देवदत्त कापसे ,कार्याध्यक्ष नगरसेवक सागर कुंदे , नगरसेवक किरण कापसे, डॉ. नितीन धारराव भास्करराव ढेपले,दिपक कि.कुंदे,शामभाऊ गोळे,यांनी (एक लाख एकावन्न हजार रुपयात) घेतला असून याचवेळी बारा गाड्यांचे पूजन करण्यात आले व विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला,

दि२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३०वाजता खंडेराव महाराज मंदिरात होम हवन होणार असून ८वाजता शनिमंदिरा पासून मांडव डाहाळ्यांची वाजत गाजत मिरवणूक निघणार असून ९ वाजता खंडेराव महाराज पादुका पासून निफाड कोर्टाच्या मागून कावडीची भव्य मिरवणुकीचा कार्यक्रम होणार आहे ,दुपारी २ वाजता कचेश्र्वर जानकीराम दुसाने यांचे निवासस्थाना पासून खंडेराव महाराज दैवतांचे पूजनास प्रारंभ होणार आहे तर दुपारी ३ वाजता श्री मारुती मंदिर व शनी चौकात होम हवन होणार आहे दुपारी ४.३०वाजता बाळासाहेब भानुदास लोखंडे यांचे जानोस घरी भागवत बाबांचे स्नान आंघोळीचा कार्यक्रम होणार आहे, सायं.६.३० वाजता रथ व बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार असून याचे मानकरी नंदू भाऊ रमेश शेलार हे आहेत यावेळी निफाड नगरपंचायत च्या माजी नगराध्यक्ष सौ.शारदा कापसे ,उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे ,मुख्याधिकारी अमोल चौधरी तसेच नगरसेवक, नगरसेविका कर्मचारी वृंद व यात्रा कमिटी मार्गदर्शक राजाराम शेलार अध्यक्ष देवदत्त कापसे, उपाध्यक्ष रतन गाजरे, कार्याध्यक्ष सागर पा. कुंदे ,खजिनदार महेश जंगम, सेक्रेटरी सुभाष कर्डिले, सचिव ह.भ.प राजेंद्र महाराज थोरात ,सहसचिव विपुल सेंद्रे, व सर्व यात्रा कमिटी सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते , तरी या यात्रा उत्सवात सर्व खंडेराव महाराज भाविक भक्तांनी परीसरातील ग्रामस्थांनी सहभाग घ्यावा असे आवाहन यात्रा उत्सव कमेटीचे वतीने करण्यात आले आहे.

# शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाडे तत्वावर देण्यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची निवासी व भोजनाची तसेच इतर सोयी सुविधांची व्यवस्था व्हावी यासाठी समाज कल्याण विभागामार्फत शासकीय वसतिगृह सुरु करण्यात आली आहेत. अकलूज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहासाठी भाडेतत्वावर इमारत देण्यासाठी इच्छुक इमारत मालकांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर, सामाजिक न्याय भवन, सात रस्ता चौक सोलापूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अकलूज, रूची डायनिंग हॉल, जून्या एस.टी. स्टँड पाठीमागे अकलूज येथे संपर्क साधावा असे आवाहन गृहपाल एस .पी. थोरात यांनी केले आहे.सदर इमारतीचे क्षेत्रफळ ७५०० चौ. फुट पर्यंत असावे, इमारती मध्ये २० ते २५ खोल्या, स्वतंत्र १० शौचालये, १० बाथरूम, स्वतंत्र वीज व्यवस्था पिण्याचे पाण्याची सोय वापरण्याच्या पाण्याची सोय, तसेच इमारती भोवती संरक्षक भिंत असणे आवश्यक आहे. तरी अकलूज नगरपरिषद हददीतील इमारत मालकांनी ७ दिवसांच्या आत मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर, सामाजिक न्याय भवन, सात रस्ता चौक सोलापूर व गृहपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह अकलूज रूची डायनिंग हॉल, जून्या एस.टी. स्टँड पाठीमागे अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर संपर्क साधावा. असे आवाहनही डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाचे श्री.थोरात यांनी केले आहे.

# पैलवान सुबोध पाटील सैनिक टाकळी केसरीचा मानकरी




सैनिक टाकळी/संजय चव्हाण : टाकळी ता. शिरोळ येथील लक्ष्मी - मरगुबाई व शिवजयंती निमित्त श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या मैदानात भरविण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत सैनिक टाकळीच्या सुबोध पाटील याला पहिला क्रमांक मिळाला त्याने दिल्लीचा पैलवान मनीष कुमार याला घिस्सा डावात चितपट करत सैनिक टाकळी केसरीचा बहुमान पटकवला.

दुसरा क्रमांक पृथ्वीराज पवार (हांडे पाटील) व मंगेश बेले (सांगली) यांच्यात झाली (सोडविण्यात आली), तिसरी कुस्ती राहुल आलदर व ऋषिकेश देवकाते यांच्यात झाली (सोडविण्यात आली), आणि चौथी कुस्ती आशपाक तांबोळी व राहुल चव्हाण यांच्या झाली व आशपाक तांबोळी हा विजयी ठरला. यावेळी कुस्ती शौकिनांनी एकच जल्लोष केला. सैनिक टाकळी यात्रा कमिटी व शिव प्रेमी यांच्या कडून निकाली कुस्तीचे आयोजन करण्यात आले होते.

सैनिक टाकळी यात्रा कमिटी कडून प्रथम क्रमांक विजेत्यास रू. २५,००० दुसऱ्या प्रथम क्रमांक विजेत्यास १५,०००, तिसऱ्या क्रमांक विजेत्यास १०,०००, व चौथ्या क्रमांक विजेत्यास ५,००० रूपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. सैनिक टाकळीचा पैलवान सुबोध पाटील यांची नुकतीच महाराष्ट्र केसरी निवड झाली होती व त्याने महाराष्ट्रात बऱ्याच मोठ्या पैलवानांना चीतपट केले आहे त्यामुळे त्याचा खेळ पाहण्यासाठी लोकांनी तुडुंब गर्दी केली होती. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस देण्यात आले कुस्ती समालोचन प्रसिद्ध कुस्तीपटू जोतीराम वाजे यांनी केले.कार्यक्रमाला या भागातील अनेक कुस्तीप्रेमी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा अनुभव मंटपाच्या प्रमुख पदी पूज्य माता महानंदाताई यांची निवड.

शिरवळ/हणमंत घोदेः विश्र्वगुरू महात्मा बसवेश्र्वर साहित्य परिषदेची उपवाहिनी सोलापूर जिल्हा अनुभव मंटपाच्या प्रमुखपदी बसवपीठ, मुगळीच्या पूज्य माता महानंदाताई हिरेमठ यांची एकमताने निवड करण्यात आली.अध्यक्षस्थानी लिंगायत विरक्त मठाचे पूज्य बसवलिंग महास्वामीजी हे होते.





अक्कलकोट येथील विरक्त मठात आयोजित महात्मा बसवेश्र्वर साहित्य परिषदेच्या बैठकीत परिषदेचे संस्थापक अध्यक्ष स्वामीनाथ हरवाळकर यांनी ही निवड जाहीर केली.यावेळी अनुभव मंटपाचे कार्य स्पष्ट करताना त्यांनी सांगितले,विश्र्वातील क्रांतिकारी असा बसव धर्माचा इतिहास आहे अठरा पगड जातींना आपल्या कवेत घेऊन वंचित घटकातील दिन,दलित आणि सर्व माता-भगिनींना एका व्यासपीठावर आणून त्यांना बसवण्णानीं बोलवते केले.याच अनुभव मंटपात लोकशाहीची स्थापना झाली.लिंगवंत धर्माच्या तेजस्वी इतिहासाच्या प्रसार व प्रचार करण्यासाठी सोलापूर जिल्हा अनुभव मंटपाची स्थापना केल्याचे हरवाळकर यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील लिंगायत बहुल तालुक्यात प्रथम अनुभव मंटपाची सुरुवात करण्यात येणार आहे.त्यानंतर हा उपक्रम प्रभावीपणे सीमावरती जिल्ह्यात राबविण्यात येणार असल्याचे पूज्य महानंदाताई हिरेमठ यांनी सांगितले.यावेळी मल्लम्मा पसारे,शिवानंद गोगाव, सुधीर माळशेट्टी,नागेश कोनापुरे, आनंद खजुरगीकर,शरणू अल्लोळी बसवराज बाके,मल्लिनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्टार प्रवाहवर सुरु होतोय धमाकेदार डान्स रिॲलिटी शो 'मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन'

### अभिनेता अंकुश चौधरी सुपर जजच्या भूमिकेत, समृद्धी केळकर करणार सूत्रसंचालन तर फुलवा खामकर आणि वैभव घुगे कॅप्टनच्या भूमिकेत



स्टार प्रवाहवर ९ मार्चपासून सुरू होत आहे धमाकेदार डान्स रिॲलिटी शो 'मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन'. या आधीच्या दोन्ही पर्वांना प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिलाय. त्यामुळे नव्या पर्वाची उत्सुकता आहे. यंदाच्या पर्वाचं वेगळेपण म्हणजे स्पर्धक जोडीने नृत्य सादर करणार आहेत. आई-मुलगी, गुरु-शिष्य, मामा-भाचे, बहिणी-बहिणी अशी अनेक नाती आणि त्यांची नृत्यकला या मंचावर पहाता येणार आहे. त्यामुळे या पर्वात मंचावर नृत्यासोबतच नात्यांमधली गंमतही अनुभवता येईल.

मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन या कार्यक्रमाच्या सुपर जजची जबाबदारी पार पाडणार आहे सुपरस्टार अंकुश चौधरी. तर लोकप्रिय अभिनेत्री समृद्धी केळकर या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणार आहे. मराठी सिनेमांमध्ये आपल्या जबरदस्त नृत्यदिग्दर्शनाने वेगळी ओळख निर्माण करणारी सुप्रसिद्ध नृत्यदिग्दर्शिका फुलवा खामकर आणि हिंदी-मराठी रिएॅलिटी शो गाजवणारा नृत्यदिग्दर्शक वैभव घुगे या कार्यक्रमाचे कॅप्टन आहेत. या ग्रॅण्ड रिॲलिटी शोविषयी सांगताना सुपरजज अंकुश चौधरी म्हणाले, 'मी होणार सुपरस्टारचं प्रत्येक पर्व हे वेगळेपण घेऊन येतं. यावेळेच्या पर्वात जोडयांची धमाल अनुभवायला मिळणार आहे. त्यामुळे फक्त नृत्यच नाही तर या मंचावर नात्यांचाही खऱ्या अर्थाने सोहळा होईल. पहिल्या दोन्ही पर्वांना भरभरुन प्रेम मिळालं. दोन्ही पर्वातल्या स्पर्धकांच्या मी अजूनही संपर्कात आहे. त्यामुळे या मंचाने मला नवा परिवार दिलाय असं म्हणू शकतो. या पर्वातही नवनव्या स्पर्धकांना भेटण्यासाठी मी उत्सुक आहे.' तेव्हा पाहायला विसरु नका मी होणार सुपरस्टार जोडी नंबर वन ९ मार्च पासून दर शनिवार रविवार रात्री ९ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.**स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**

# महासंस्कृती महोत्सव: सोलापूरात आजपासून पाच दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत विविध व नाविन्यपुर्ण उपक्रमाचे आयोजन पर्यटन विभागामार्फत करण्यात येत आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने २१ ते २५ फेब्रुवारी २०२४ कालावधीत शिवछत्रपती रंगभवन, सिटी एग्झिबीशन सेंटर, सोलापूर येथे महासंस्कृती महोत्सवाचे करण्यात आले आहे.

पाच दिवस चालणाऱ्या महासंस्कृती महोत्सवाचा लाभ जिल्ह्यातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे

राज्यातील विविध विभागातील संस्कृतीचे आदान- प्रदान, स्थानिक कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, लुप्त होत चाललेल्या कला व संस्कृतीचे जतन व संवर्धन, स्वातंत्र्यलढ्यातील ज्ञात- अज्ञात लढवय्यांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा पाच दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २१ फेब्रुवारी रोजी सुंदर माझी शाळा हा कवितेची सांगीतीक मैफिल व मधुरव -बोरु ते ब्लॉग हा मराठी भाषेचा रंजक इतिहास सांगणारा कार्यक्रम होणार आहे.दि २२ फेब्रुवारी रोजी स्थानिक कलाकारांचा पारंपरिक लोककलांचा कार्यक्रम होणार आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी पंडित भिमन्ना जाधव, व्यंकटेश भिमन्ना जाधव व कलाश्री जाधव यांचा सुंद्रीवादन कार्यक्रम तसेच महाराष्ट्राची लोकधारा नृत्यविष्कार हा कार्यक्रम होणार आहे.दि. २४ फेब्रुवारी रोजी वंदे मातरम देशभक्तीपर गायन कार्यक्रम होईल.दिनांक २५ फेब्रुवारी रोजी गुढी महाराष्ट्राची हा नृत्य नाट्य कार्यक्रम होणार आहे.

महासंस्कृती महोत्सवाचे कार्यक्रम दोन टप्यात होणार असुन शिवछत्रपती रंगभवन सोलापूर येथे दि २१ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत व २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ४.०० ते रात्री ०८.०० वाजेपर्यंत कार्यक्रम होणार आहे. तसेच सिटी एग्झिबीशन सेंटर, सोलापूर येथे दि २३ ते २५ फेब्रुवारी पर्यंत कार्यक्रम होणार आहेत. त्याचबरोबर शिवकालीन शस्त्रे, शिल्पकला, जैवविविधता तसेच वस्त्र दालन असे विविध दालन पहायला मिळणार आहे. त्याचबरोबर सुंदर माझी शाळा हा कार्यक्रम दि. २२ फेब्रुवारी रोजी सदाशिवराव माने विद्यालय, अकलुज येथे तर २३ फेब्रुवारी रोजी श्री. कमलाभवानी मंदीर पार्किंग स्थळ, श्री देवीचा माळ, करमाळा या ठिकाणी देखील होणार आहे.

# माढा येथे शिवजयंतीच्या निमित्ताने भव्य भगव्या रॅलीचे शिवसेना माढा तालुका प्रमुख मुन्ना साठे यांच्या नेतृत्वाखाली आयोजन



माढा/प्रतिनिधीः शिवसेना शिंदे गटाचे माढा तालुकाप्रमुख मुन्ना साठे यांनी शिवजयंतीच्या निमित्ताने भव्य भगव्या रॅलीचे आयोजन केले होते...भगवे झेंडे मोटारसायकलला बांधून निघालेल्या या रॅलीला शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा शिवाजीराव सावंत यांनी स्वता उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या,तर संपूर्ण तालुक्यातून आलेल्या शिवप्रेमींनी माढा शहराला भगवे स्वरूप आले होते, शिवसेनेचे माढा तालुकाप्रमुख मुन्ना साठे यांनी या भव्य रॅलीचे नेटके नियोजन केले होते,

माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील झेंड्यापासून या रॅलीला सुरुवात झाली,तर माढा शहरातील सर्व प्रमुख मार्गावरून ही भगवी रॅली निघाली यावेळी शिवसेना माढा शहरप्रमुख भैय्या खरात यांच्यासह शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख सचिन कदम, नितीन जाधव,विठ्ठलवाडी चे माजी सरपंच हनुमंत जाधव,जावेद कोरबू, महातपूरचे शिंदे गटाचे नेते महेश मोहोळे, सम्मेद साबळे,निमगावचे सरपंच धर्मराज मुकणे, अजित साळुंखे,नाना साळुंखे, सुहास पाटील, समाधान मस्के, बालाजी नाईकवाडे, अमोल धर्मे, यांच्यासह रघुवीर मोटे, शिंदेवाडीचे अविनाश शिंदे लोंढे वाडीचे मुकूंद कदम आदी उपस्थित होते